## आजचा शुभ विचार

""नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!








मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-45 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thurseday 19 June 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ४५ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ गुरुवार, दि. १९ जुन २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## भारतीय अंतराळवीर 22 जून रोजी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने रवाना होणार

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

------------------

भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर घेऊन जाणारे ॲक्सिओम-४ मिशन २२ जून रोजी रवाना होणार आहे. याआधी वेगवेगळ्या तांत्रिक कारणांमुळे मागील काही दिवसांत ही मोहीम वारंवार पुढे ढकलली जात होती. आधी प्रतिकूल हवामानामुळे, नंतर यानातील वायू गळती सुरू झाल्याचे लक्षात आल्यामुळे मोहीम पुढे ढकलण्यात आली होती.




मोहीम सुरळीत आणि सुरक्षितरित्या व्हावी यासाठी खबरदारी घेतली जात आहे. किरकोळ चूक नंतर जीवघेणी ठरू शकते. यामुळेच तांत्रिक दोष लक्षात येताच ते दूर करण्यासाठी मोहीम काही काळ पुढे ढकलली होती. पण आता परिस्थिती नियंत्रणात आहे आणि ॲक्सिओम-४ मिशन २२ जून रोजी रवाना होईल, असे या मोहिमेशी संबंधित असलेल्या वरिष्ठांकडून सांगण्यात आले.

ॲक्सिओम-४ मिशनमध्ये भारताचे शुभांशू शुक्ला तसेच पोलंड, हंगेरी आणि अमेरिकेचे अंतराळवीर आहेत. ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला हे १९८४ नंतर अंतराळात जाणारे भारताचे दुसरे राष्ट्रीय अंतराळवीर आहेत. याआधी १९८४ च्या एप्रिल महिन्यात रशियाच्या यानातून भारतीय अंतराळवीर राकेश शर्मा अंतराळात गेले होते. यामुळे भारतीयांचे लक्ष ॲक्सिओम-४ मिशनकडे आहे.

## जागतिक आर्थिक संकटातही भारताने चांगला विकास दर राखला - मुख्य आर्थिक सल्लागार व्ही अनंथा नागेस्वरन

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

----------------------

जगभरात प्रतिकूल परिस्थिती असतानाही भारताने चांगला विकास दर राखला आहे असे प्रतिपादन भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही अनंथा नागेस्वरन यांनी केले आहे. प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना ते म्हणाले, 'सध्याच्या संकटाच्या काळातही भारत चांगल्या प्रकारे मार्गक्रमण करत आहे. जागतिक स्थिती अस्थिरत असतानाही आपण चांगली कामगिरी करत आहोत. राजकीय व आर्थिक स्थिती पाहता विकास दर वाढीसाठी अनुकूल नाही. अजूनही अस्थिरता कायम आहे त्यामुळे गुंतवणूकदार आपल्या गुंतवणूकीला तत्काळ स्थगिती देऊ शकतात 'असे त्यांनी यापुढे म्हटले आहे. वैश्विक अर्थव्यवस्थेबाबत प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे.

जागतिक बँकेच्या अहवालावर बोलताना ते म्हणाले की, ' सध्या आताच सांगणे कठीण आहे की आताची परिस्थिती २००८ आर्थिक मंदीसारखी आहे का? मला नाही वाटत २००९ सारखी जागतिक मंदी पातळी आता आहे.गेल्या ७ वर्षातला विकास दरवृद्धीसाठी हा संथ काळ आहे. काही विशिष्ट बाबतीत २००८ वैश्विक मंदीपेक्षा



प्रतिकूल प्रभाव असू शकतो मात्र हा पुढेही पसारू शकतो.'

यापुढे त्यांनी म्हटले होते की, सध्याची एकत्रित परिस्थिती पाहता, भारतीय अर्थव्यवस्थेने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ६.५% विकासदर कायय राखला आहे व आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये हा दर ६.३ ते ६.८% पातळीवर राहू शकतो असा आमचा अंदाज आहे.'

जागतिक व्यापार (Trading) परिस्थितीवर सकारात्मक भाष्य करताना नागेस्वर न म्हणाले, ' आपली जागतिक मुत्सद्दीपणा, पेट्रोलियम मंत्रालय, पंतप्रधान मोदींचे प्रयत्न, परराष्ट्र मंत्रालय यांच्या एकत्रित परिणाम म्हणून निश्चित आहे की भारतीय उर्जा क्षेत्रात पुरवठा प्रभावित होणार नाही. आपली जगभरातील प्रतिमा आश्वासक असल्याने आपण उत्तम मध्यस्थ (Mediator) आहोत. त्यामुळे प्रत्येक जगातील देशाला भारताच्या प्रतिष्ठेशी संलग्न व्हायचे आहे.'

आर्थिक स्थितीवर बोलताना ते पुढे म्हणाले,' व्यापाऱ्यांच्या घडामोडी बघताना भारत आयात शुल्क कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहे जेणेकरून घरगुती उत्पादनाच्या किंमतीही नियंत्रणात राहतील. जागतिक परिस्थितीचा फायदा घेताना आपल्या देशात शिक्षण, कौशल्य विकास,खनिज उत्पादन यावर गुंतवणूक करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.भारताचे उत्पादन,सेवा क्षेत्रातील प्राथमिक अस्तित्व आपल्या देशाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे' असे त्यांनी म्हटले.

दरम्यान नुकताच जागतिक बँकेचा अहवाल प्रदर्शित झाला होता ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय राजकीय आर्थिक स्थितीबाबत व्यक्त होताना जागतिक अर्थव्यवस्थेवरही विस्तृत भाष्य केले होते. अहवालात म्हटल्याप्रमाणे, यंदा २००८ साली उद्भवलेल्या जागतिक मंदीची नांदी दिसून येते. त्यावर भाष्य करताना भारताचे मुख्य आर्थिक वर्ष संपल्यानंतर व्ही अनंथ नागेस्वरन यांनी भारताची जागतिक संकटाच्या काळातही होणारी आर्थिक प्रगती ठळकपणे मांडली.

## सोलापूर-हैदराबाद महामार्गावर कंटेनर आणि ॲसिडचा टँकर यांच्यात भीषण अपघात! वाहनचालक जागीच ठार

### नायट्रिक ॲसिडच्या गळतीने नागरिकांना श्वास घ्यायला होतोय त्रास

राजेश यादव
सोलापूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

सोलापूर - हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील मुळेगाव तांडा परिसरात बुधवारी (दि. १८) सकाळी कंटेनरने ॲसिडच्या टँकरला धडक दिल्यामुळ भीषण अपघात घडलाय. भरधाव वेगात असलेल्या कंटेनरने दुभाजक तोडून विरुद्ध दिशेने येणाऱ्या ॲसिडने भरलेल्या टँकरला जबर धडक दिली. या अपघातात एका वाहनचालकाचा मृत्यू झाला असून, एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही संपूर्ण घटना महामार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

भरधाव कंटेनरने दुभाजक ओलांडून थेट समोरून येणाऱ्या टँकरला धडक दिली. कंटेनरने



धडक दिलेल्या टँकरमध्ये नायट्रिक ॲसिड भरलेले होते. अपघातानंतर टँकरमधून नायट्रिक ॲसिड बाहेर पडले. यामुळे नागरिकांना श्वास घेण्यात अडचणी येत आहेत. या अपघातात एका चालकाचा जागीच ठार झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. त्याला उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. या प्रकरणी सोलापूर तालुका पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

दरम्यान, कंटेनर रिव्हर्स घेत असताना कंटेनर पलटल्याने चालकाचा जागीच मृत्यू झाला. राम लखन चव्हाण (48) असे मृत चालकाचे नाव आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, कंटेनर भिवंडीच्या दिशेने जात असताना चालकाने रिव्हर्स घेतला. मात्र मागील बाजू उंच असल्यामुळे तोल जाऊन कंटेनर पलटला आणि चालक त्यात अडकून दबला. यात त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. भिवंडी-कल्याण मार्गावरील पाईपलाईन परिसरात भीषण अपघात घडला आहे. या अपघातामुळे भिवंडी-कल्याण मार्गावर काही काळासाठी वाहतूक कोंडी झाली होती.

घटनेची माहिती मिळताच शांतीनगर पोलीस आणि वाहतूक पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या. दरम्यान, या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून मृतदेह शवविच्छेदनासाठी भिवंडीतील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या अपघातासंदर्भात पुढील तपास शांतीनगर पोलीस करीत आहेत.

## देशभरात ६८३६ कोरोनाचे रुग्ण सक्रिय

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------

देशभरातील सक्रिय रुग्णांची संख्या ६८३६ वर आली आहे. गेल्या ६ दिवसांत सक्रिय रुग्णांमध्ये २८५ ने घट झाली आहे. मागील २४ तासांत एकही नवीन रुग्ण आढळला नाही, तर ४२८ रुग्ण बरे झाले आहेत. केरळमध्ये सर्वाधिक १६५९ सक्रिय रुग्ण



आहेत.

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, नवीन प्रकारामुळे आतापर्यंत १०९ जणांचा मृत्यू झाला आहे. केरळमध्ये सर्वाधिक ३५ जणांचा मृत्यू झाला आहे. महाराष्ट्रात २९ जणांचा मृत्यू झाला आहे. मध्यप्रदेशच्या इंदोरमध्ये उपचारादरम्यान २ कोविड रुग्णांचा मृत्यू झाला. हे दोन्ही रुग्ण खरगोन आणि रतलाम जिल्ह्यातील होते. इंदूरमध्ये ७१ सक्रिय रुग्ण आहेत. गेल्या २४ तासांत २ नवीन रुग्णांची नोंद झाली आहे. जूनमध्ये आतापर्यंत १०६ रुग्णांची नोंद झाली आहे.

## गुजरातमध्ये हिंदीसक्ती नाही, मग महाराष्ट्रात का लादता..?

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------

महाराष्ट्र शासनाने त्रिभाषा सूत्र लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य शासनाच्या या निर्णयाला मनसे विरोध करणार असल्याचे राज ठाकरे यांनी जाहीर केले. पत्रकार परिषद घेऊन मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी ही घोषणा केली. मराठी शाळांमध्ये हिंदी भाषा लादली जाणार असेल तर त्याचा तीव्र विरोध करू, असे राज ठाकरे म्हणाले. त्रिभाषा सूत्राचा राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी काहीही संबंध नाही. गुजरातमध्ये जर तिसरी भाषा सक्तीची नसेल, तर महाराष्ट्रातच ती का लादली जाते ? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

शासन निर्णयानुसार, मराठी शाळांमध्ये तीन भाषा शिकवल्या जाणार आहेत — मराठी, इंग्रजी आणि विद्यार्थ्यांनी निवडलेली तिसरी भाषा. ती तिसरी भाषा कोणतीही भारतीय भाषा असू शकते, पण ती शिकवण्यासाठी किमान २० विद्यार्थ्यांची मागणी आवश्यक आहे. हिंदीचा उल्लेख 'ऐच्छिक' असल्याचे नमूद करण्यात आले आहे. राज ठाकरे यांनी यावर नाराजी व्यक्त करत म्हटले की, "दोन महिन्यांपूर्वी सरकारने हिंदी सक्ती न करण्याचे तोंडी आश्वासन दिले होते. मात्र कालचा निर्णय पाहता, मराठी विद्यार्थ्यांवर हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न पुन्हा सुरू झाला आहे." जर आज हिंदी लादली गेली तर उद्या मराठी भाषा नष्ट होईल," असा इशारा देत राज ठाकरेंनी सर्व मराठी बांधवांना शासनाच्या या निर्णयाविरोधात एकत्र येण्याचे आवाहन केले. राज्य शासनाने निर्णय मागे घ्यावा नाहीतर मनसे स्टाईल आंदोलन सुरू करण्याचा इशारा राज ठाकरेंनी दिला आहे.

महाराष्ट्रातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा बंधनकारक असणार असल्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी स्पष्ट केले आहे. इयत्ता पाचवीपासून हिंदी विषय शिकविला जातो, आणि तो अनेक वर्षांपासून अभ्यासक्रमाचा भाग आहे. इतर माध्यमांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची मातृभाषा, मराठी आणि इंग्रजी या तीन भाषा शिकवल्या जाणार आहेत.

### महाराष्ट्रातील शाळांच्या मुख्याध्यापकांना राज ठाकरेंचे पत्र

महाराष्ट्रातील तमाम शाळांच्या मुख्याध्यापकांना सस्नेह जय महाराष्ट्र, एप्रिल महिन्यापासून महाराष्ट्रात शिक्षण विभागाचा नुसता गोंधळ सुरु आहे. आधी महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम असलेल्या शाळांमध्ये इयत्ता



पहिलीपासून तीन भाषा शिकवायच्या आणि त्यात मराठी, इंग्रजी आणि हिंदी सक्तीची करायची असा निर्णय आला. ज्याला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कडाडून विरोध केला, पुढे त्यावर जनमत तयार झालं. पुढे जनमताचा रेटा बघून सरकारने हळूच पळवाट काढली आणि सांगितलं की हिंदीची सक्ती नसेल पण कोणाला हिंदी शिकायची असेल तर तो अभ्यासक्रम उपलब्ध करून दिला जाईल. हिंदी भाषेच्या सक्तीचा प्रश्नच येत नाही. कारण हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही. ती उत्तरेतल्या काही प्रांतांमध्ये बोलली जाणारी भाषा आहे, म्हणजे एका अर्थाने ती असलीच तर राज्यभाषा आहे. त्यात ती ज्या राज्यांमध्ये बोलली जाते तिथे पण अनेक स्थानिक भाषा आहेत, ज्या हिंदीच्या वरवंट्याखाली येऊ लागल्यात आणि अशी भीती आहे की तिथल्या स्थानिक बोलीभाषा काळाच्या ओघात नष्ट होतील. अर्थात आपली स्थानिक बोलीभाषा मरु द्यायची का नाही हा निर्णय त्यांनी घ्यायचा आहे, आपल्या काय देणंघेणं त्याच्याशी.

पण महाराष्ट्रात जेंव्हा अशी सक्ती आली तेंव्हा मात्र आम्ही आवाज उठवला आणि यापुढे पण उठवत राहणार. पुढे सरकारने सांगितलं की इयत्ता पहिलीपासून दोनच भाषा शिकवल्या जातील. बरं याचा लेखी आदेश अजून आला आहे का ? तसा तो कुठे आला असेल तरी आम्हाला तो दिसला नाही. कागदी घोडे नाचवण्यात हुशार असलेलं सरकार हा कागद पण नाचवून दाखवेल. मग आमचा प्रश्न आहे मग तिसरी भाषाच मुलांना शिकायची नाहीये तर मग पुस्तक छपाई का सुरु आहे. माझ्या महाराष्ट्र सैनिकांच्या निदर्शनास आलं आहे की पुस्तक छपाई सुरु आहे. याचा अर्थ सरकार छुप्या मार्गाने भाषा लादण्याचे उद्योग करणार असं दिसतंय. याला तुम्ही शाळांनी सहकार्य करू नका. मुलांवर भाषा लादण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, जो हाणून पाडला पाहिजे. यांत एकतर मुलांचं नुकसान आहेच पण मराठी भाषेचं नुकसान आहे.

सरकार काय वरून जे सांगतील त्याच्या मागे घरंगळत जायला तयार आहे, पण तुम्ही बळी पडू नका. तशी गरजच नाही. आणि तुम्हाला सरकारकडून जबरदस्ती झाली तर आम्ही आहोत. मुळात त्यांना उत्तम सुशिक्षित नागरिक होऊन देशाचं तसंच महाराष्ट्राचं नाव मोठं करण्यासाठी राज्य भाषा आणि एक जागतिक भाषा शिकली म्हणजे झालं ,अजून भाषांची आत्ता खरतर काय गरज ? पण हे चाललेलं राजकारण आपण समजून घेतले पाहिजे ! उत्तरेतल्या लोकांना सुसंकृत महाराष्ट्र काबीज करायचा आहे आणि त्यासाठीचा सोपा मार्ग म्हणजे थेट किंवा आडवळणाने त्यांची भाषा माथी मारायची. त्या राजकारणाला तुम्ही बळी पडू नका. उद्या ती मुले मोठी झाल्यावर त्यांच्या गरजेनुसार त्यांना हवी ती भाषा ते शिकू शकतात पण आत्ता पासूनच हे ओझे त्यांच्यावर कशाला ? तुम्ही ठाम राहिलात आणि सरकारचे मनसुबे उधळून लावलेत तर आम्ही तुमच्या पाठीशी पहाडासारखे उभे राहू. पण तुम्ही स्वेच्छेने सरकारच्या छुप्या हेतूंना मदत करून, महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांवर भाषेचं ओझं लादणार असाल आणि अशी भाषा लादणार असाल, जी शिकली काय नाही शिकली काय, फरक पडत नाही, तर मात्र माझे महाराष्ट्र सैनिक तुमच्याकडे (चर्चेला ) येतील.

या विषयांत जसा आम्ही तुमच्याशी संवाद साधतोय तसंच एक पत्र आम्ही सरकारला पण पाठवलं आहे. हिंदी भाषेच्या किंवा एकूणच तिसऱ्या भाषा शिकवली जाणार नाही याचं लेखी पत्र हवं असं आम्ही सरकारला ठासून सांगितलं आहे. ते पत्र काढतील किंवा न काढतील, पण तुम्ही या बाबतीत सरकारच्या छुप्या हेतूंना मदत करणार असाल तर हा आम्ही महाराष्ट्र द्रोह समजू हे नक्की... महाराष्ट्रात या भाषा लादण्याच्या प्रकरणाबाबत प्रचंड असंतोष आहे हे आपण ध्यानात ठेवावे ! बाकी आपण सुज्ञ आहातच ! अधिक काय लिहीणे....!

**आपला**
**राज ठाकरे**

संपादकीय

# जखम मांडीला... मलम शेंडीला...!

मुंबई देशाची आर्थिक राजधानी असल्यामुळे नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने मुंबईमध्ये आसपासच्या उपनगरांमधून मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ हे दररोज सेंट्रल आणि वेस्टर्न लोकल सेवेच्या माध्यमातून मुंबईत ये-जा करते. मुंबई लगत असलेला ठाणे जिल्हा, पालघर जिल्हा, नाशिक जिल्हा तसेच रायगड आणि पुणे जिल्ह्यातूनही दररोज मुंबईत येणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. साहजिकच या साऱ्या प्रवाशांना मुंबईत आणण्याची आणि मुंबईतून पुन्हा त्यांच्या गावी सोडण्याची जबाबदारी ही मुंबईतील या दोन्ही उपनगरीय रेल्वे सेवांवर आहे. साहजिकच याचा प्रचंड ताण हा या दोन्ही उपनगरीय रेल्वे सेवांवर वाढतो आहे.

देशभरात मुंबईबाबत असलेल्या आकर्षणामुळे नशीब उजळण्यासाठी मुंबईत येणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे म्हणतात त्याप्रमाणे दररोज मुंबई महाराष्ट्रावर लोंढेच्या लोंढे हे आदळतच असतात, तर प्रत्यक्षात मुंबईत राहणे हे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असल्यामुळे मग ठाण्यापासून ते अगदी डोंबिवली, कल्याण, अंबरनाथ, बदलापूर, टिटवाळा, कर्जत, कसारा आणि पश्चिम उपनगरांमध्ये मीरा-भाईंदर पासून ते अगदी वसई, विरार, डहाणूपर्यंत आणि त्याही पुढे मोठ्या प्रमाणावर गावांचे झपाट्याने शहरीकरण झाले आहे. या साऱ्या बकाली शहरीकरणाचा सर्वात मोठा स्फोट हा मुंबईच्या लोकल वाहतुकीवर दिसून येतो. अगदी १९९० ते ९५ पर्यंत मध्य रेल्वेच्या ठाणे पुढील रेल्वे गाड्यांमध्ये फारशी गर्दी नसायची.

१९९५ नंतर नागरिकरणाची जी काही एक मोठी लाट महामुंबईतील उपनगरांमध्ये उसळली. या लाटेने कळवा, मुंब्रा, दिवा, ठाकुर्ली ही अन्य रेल्वे स्थानकांच्या मानाने लहान असलेली स्थानकेही गर्दीने तुडुंब भरून टाकली. हळूहळू कल्याणपर्यंत वाढलेले हे लोंढे २००५ पर्यंत अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर, कर्जत, टिटवाळा, आसनगाव, कसारा इथपर्यंत जाऊन पोहोचले आणि त्यानंतर मात्र मध्य रेल्वेची मुंबई लोकल सेवा ही खऱ्या अर्थाने प्रवासी गर्दीचा स्पोट ठरू लागली. यामुळेच कोणी एकेकाळी निवांत प्रवासासाठी ओळखली जाणारी मुंबई लोकल ही गेल्या २५ वर्षांत तब्बल ५० हजारांहून अधिक लोकल प्रवाशांचा बळी घेणारी जीवघेणी लोकल सेवा ठरली आहे. कोण आहे याला जबाबदार? भारतीय रेल्वे? राज्य सरकार? एमएमआरडीए? स्थानिक महापालिका? नगर परिषदा की ग्रामपंचायती? तसे बघायला गेल्यास हे सगळेच याला खरे तर जबाबदार आहेत.

रेल्वे गाड्यांची संख्या वाढवणे, नऊ डब्यांच्या लोकल १२ डब्यांच्या करणे. मग नंतर त्या पंधरा डब्यांच्या करणे, सर्वसाधारण लोकल बरोबरच बंदिस्त दरवाजांच्या एसी लोकल सुरू करणे आणि आता तर मुंब्रा येथील दुर्घटनेनंतर रेल्वे बोर्ड सर्वसाधारण नॉन एसी लोकल गाड्यादेखील बंदिस्त दरवाजांच्या करण्याचे ठरवत आहे. या उपाययोजना ऐकल्या की रेल्वे बोर्डात निर्णय प्रक्रियेत असलेल्या उच्चपदस्थ बांबूची अक्षरश: कीव येते. हे म्हणजे जखम मांडीला, मलम शेंडीला... अशातला प्रकार आहे.

लोकल प्रवाशांच्या समस्येचे मूळ गेल्या दोन दशकांत बेसुमार पद्धतीने वाढलेल्या प्रवासी लोंढ्यांमध्ये आहे हे जोपर्यंत रेल्वे प्रशासन आणि राज्यकर्ते लक्षात घेत नाहीत तोपर्यंत मुंबई लोकलमधील प्रवाशांचे लोकल गाड्यांमधून पडून होणारे मृत्यू हे थांबणारे नाहीत हे अत्यंत भीषण आणि कटू सत्य आहे. गर्दीचे लोंढे थांबवणे हा यावरील उपाय असला तरी देखील तो अमलात येणे कठीण आहे. मात्र याचा अर्थ यावर उपाययोजना नाहीत असा बिलकूल नाही. यावर निश्चित अशा उपायोजना आहेत मात्र ती करण्याची इच्छाशक्ती आणि निर्णय क्षमता ही रेल्वे प्रशासनामध्ये त्याचप्रमाणे येथील राजकीय नेतृत्वामध्ये नाही हे ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यांचे दुर्दैव आहे.

मुंबई लोकल सेवेला पर्यायी रस्ते प्रवासी वाहतूक ही मुंबई ते कल्याणपर्यंत आणि पश्चिम रेल्वेवर वसई-विरारपर्यंत उपलब्ध आहे. मात्र ती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर आहे. ठाणे, पालघर जिल्ह्यामध्ये जलवाहतुकीला मोठी संधी आहे, तथापि जलवाहतुकीचे क्षेत्र हे अद्याप मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगडपर्यंत विकसित झाले नाही.

मात्र जर मुंबईतील लोकल सेवेचे नियोजन डोके ठिकाणावर ठेवून केले, तर निश्चितच मुंबईतील उपनगरीय लोकल सेवांवर पडणारा ताण आणि त्याचबरोबर प्रवाशांना करावा लागणारा जीवघेणा प्रवास यातून निश्चितच काही प्रमाणात दिलासा मिळू शकेल. यासाठी सर्वात आधी गर्दीचे विभाजन करणे हे अत्यंत आवश्यक आहे. लोकल गाड्यांमधील गर्दी ही कमी करता येऊ शकत नाही मात्र ती विभागता नक्कीच येऊ शकते. यासाठी रेल्वेला फार काही मोठे निर्णय घेण्याची अथवा मोठा खर्च करण्याची देखील आवश्यकता नाही.

मध्य रेल्वेच्या बाबतीत जर विचार करायचा झाला, तर मुंबई ते ठाणे हा एक प्रमुख झोन आहे. ठाणे ते कल्याण हा दुसरा आहे, तर कल्याण ते कर्जत कसारा असा तिसरा झोन आहे. ज्याप्रमाणे मुंबई आणि ठाणे दरम्यान मोठ्या प्रमाणावर ठाणे लोकल चालवल्या जातात त्याच धर्तीवर जर का ठाणे-कल्याण, ठाणे-कर्जत, ठाणे-कसारा अशा लोकल फेऱ्या जर का अधिक प्रमाणात सुरू करता आल्या, तर ठाण्यापासून कल्याण, कर्जत, कसाराच्या दिशेने जे प्रवासी प्रवास करतात त्यांना मुंबईतून तुडुंब भरून आलेल्या लोकलमधून जीवघेणा प्रवास करायची गरज भासणार नाही. त्याचबरोबर कर्जत, कसारा मार्गावरून आणि अगदी कल्याणहून देखील वाशी आणि पनवेल या मार्गावर लोकल सेवा सुरू करणे सहज शक्य आहे. कारण या मार्गावरून अनेक लांब पल्ल्यांच्या गाड्या पनवेलकडे जातात.

जर का पनवेल आणि वाशीच्या लोकल गाड्या कल्याण, कर्जत, कसारावरून थेट सुरू केल्या, तर ठाण्याला होणारी प्रचंड गर्दी ही निश्चितच कमी होऊ शकते. त्याचप्रमाणे कोकण रेल्वेच्या गाड्या पकडण्यासाठी कर्जत कसारा ते अगदी भिवंडी या मार्गावरील प्रवाशांना ठाण्याला यावे लागते. त्याऐवजी जर का कल्याण वरून कोकण रेल्वे मार्गावरील मडगावपर्यंत रेल्वे गाडी सुरू केली, तर त्याचा खूप मोठा फायदा हा या मार्गावरील लाखो कोकणवासीयांना होऊ शकणार आहे.

याबरोबरच कल्याणचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी दिवा लोकल सुरू करण्याची मागणी केली आहे ती देखील रास्त आहे. रेल्वेच्या या उपाययोजनांबरोबरच रेल्वेला पर्याय ठरू शकेल असा सक्षम सार्वजनिक वाहतुकीचा पर्यायी मार्ग हा नजीकच्या काळात उपलब्ध करून द्यावा लागणार आहे. त्याकरिता ज्याप्रमाणे बेस्टने मुंबईतून ठाण्यापर्यंत वातानुकूलित बस सेवा सुरू केल्या होत्या त्याच धर्तीवर जर का ठाण्याहून कल्याण, डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ, टिटवाळा या मार्गावर एसी बस सेवा सुरू झाल्या, तर निश्चितच लोकल गाड्यांमधील जीवघेण्या प्रवासापेक्षा या रस्ते वाहतुकीला अधिक प्राधान्य मिळेल. ओला, उबेरसारखी खासगी कंपनी महामुंबईसारख्या उपनगरांमध्ये उत्तम सेवा देत असेल, तर राज्य सरकारला हे का बरं करता येणे शक्य नाही, याचाही विचार होणे गरजेचे आहे.

## विचार पुष्प

आपल्या आयुष्याचा शेवटचा दिवस, शेवटचा प्रवासी थांबा, शेवटचा श्वास कुठे थांबेल हे कुनालाच ज्ञात नसते. एकना एक दिवस ह्या भौतीक मायावी जगाचा निरोप घ्यावाच लागेल हे माहित असूनही मनुष्य एवढी धावाधाव का करतो ? कुणासाठी करतो ? ज्यांच्यासाठी अहोरात्र मेहनत करून धनदौलत कमावतो उतारा सातबाऱ्याचा कुटाणा करतो ते देखील कर्मसोहळ्यात नसणार मग एवढा खटाटोप का? जोपर्यंत अखेरचा श्वास अंतीम स्थळावर नेऊन सोडत नाही, तोवर आनंदाने जगुन घ्यावे. हौस मौज तिर्थाटण पर्यटन करून घ्यावे. संसारात परमार्थ विवेक विचाराने करून थोडेबहु पूण्य पदरात पाडून घ्यावे.

आयुष्यभर A C गाडी A C बंगल्यात राहाणाऱ्यालाही दुसऱ्याच्या खांद्यावर स्मशानस्थळी अखेरचा मायावी संसाराचा बाजार सोडून विसावा घ्यावाच लागतो. तिथे ना A C गाडी ना A C बंगला ना ॲक्वागार्डचे ना बिसलरीचे पानी. उघड्यावरती शव सोडती पानी गंगेचे पाजती. म्हणून म्हणतो दुसऱ्याच्या डोळ्यातील अश्रूपुसा कर्माची पुजा बांधा. दिले घेतले इथेच राही । नाही कुनी सोबती नेई । तुम्ही वड आहात तर दुसऱ्याचे आधारवड व्हा. संत कबीर एका दोह्यात सांगतात. काया जावे माया जावे जावे तिनही लोक । जितना देखे उतना जावे क्या करते जनलोक । भाई राम कहो रे पैसा हे साधन आहे साध्य नाही. भौतीक सुखाच्या गरजा भागवण्याचे साधन आहे. तुमच्या आचार विचार उच्चार यातून जे कर्म घडते ते साध्य आहे. दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य निर्मान करा हिच परब्रम्हाची आरती होय

**गावगाडाकार**
**साहेबराव नंदन**
**तात्या नाशिक**

# अ.ध. वसावे साहेबांसारखी माणसे दगड झाली म्हणूनच उमवि सारखे नंदनवन फुलवू शकलो

## प्रथम कुलगुरु डॉ. एन. के. ठाकरे यांचे प्रतिपादन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------




उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाची स्थापना झाली त्यावेळची परिस्थिती केविलवाणी होती; शासनाने केवळ बारा लाखाची मदत केली. तत्कालीन सरकार बरे होते, आमच्या कामकाजात त्यांनी हस्तक्षेप केला नाही. सरकारने मला विद्यापीठ कार्यकारिणी निवडण्याचे सर्वाधिकार दिले म्हणून मी अ.ध. वसावे साहेब यांचे नाव सुचवू शकलो. कार्यकारिणीत वसावे साहेबांसारखी सुंदर माणसे स्वत: काम करतांना दगड झाली म्हणूनच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रुपाने नंदनवन फुलवू शकलो. असे प्रतिपादन कबचौ विद्यापिठाचे संस्थापक कुलगुरु तात्यासाहेब डॉ. एन. के. ठाकरे यांनी काल मातृपितृ आचार्य स्मृती जागरण सेवाभावी स्वयंसेवी संस्था कावठेच्या वतीने आदिवासी समाजातील प्रथम सेवानिवृत्त सनदी अधिकारी अ.ध. वसावे साहेब यांच्या शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातील भरीव कार्याबद्दल त्यांना 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान सोहळा समारंभ प्रसंगी बोलतांना केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य बी.एस.दादा पाटील होते.

अ.ध. वसावे साहेब हे निगर्वी असून त्यांनी कार्यकारिणीत काम करतांना कधीही सोयी सुविधांचा आग्रह धरला नाही. आदिवासीपण जपले, आदिवासीपण जपण्याची आवश्यकता असून त्यासाठी नंदूरबार येथे स्वतंत्र आदिवासी विद्यापीठ व्हावे अशी आग्रही मागणी डॉ. ठाकरे यांनी केली. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विश्वास पाटील आपल्या भाषणात म्हणाले, अ. ध. वसावे साहेब हे अक्षराचे उपासक आहेत. त्यांचे जीवन समर्पित आहे. त्यांच्या जीवनातून समर्पणाचा धडा घेतला तर नक्कीच आजचा सत्कार सार्थकी लागेल. प्राचार्य एम.एल. नानकर भाषणात सांगितले की सत्यतेचा धडा आम्ही वसावे साहेब यांच्याकडून शिकलो. त्यांची शिकवण भविष्यात आम्हाला कामी आली. उपकुलगुरु एस.टी. इंगळे म्हणाले, तत्कालीन कार्यकारिणीत अ.ध. वसावे साहेबांसारखी माणसांनी जो विद्यापीठाचा पाया रचला कणखर केला त्यामुळेच आम्ही आज सुलभ काम करू शकलो, मानांकन मिळवू शकलो. माजी कुलगुरु डॉ. के. बी. पाटील आपल्या भाषणात म्हणाले, 'अ.ध. वसावे साहेबांचे वागणे सर्तुष्य माणसासारखे आहे. निवृत्तीनंतर विद्यापीठात त्यांनी पायाभरणीचे जे काम केले ते अतुलनियच होते. त्यांची भावना प्रामाणिक असते. निवृत्तीनंतर पंचतारांकित जीवन जगणे शक्य होते; परंतु ते ठोकरून समाजात मिसळले. त्यांच्या कामाचे नक्कीच मूल्यमापन होईल. समाज, गाव, तालुका, जिल्हा, त्यांच्या कार्यकर्तृत्वाला विसरणार नाही.

अ.ध. वसावे साहेब सत्काराला उत्तर देतांना म्हणाले, "मी ७० वर्ष सार्वजनिक जीवनात फिरतो आहे. मुलांना नुसते शिक्षण न देता जगण्याची कला शिकविली पाहिजे. शिक्षक जोपर्यंत मुलांना स्वत:ची मुले मानून शिकवत नाहीत तोपर्यंत शिक्षणाला अर्थ नाही. मी जे काम केले तो माझ्या आनंदाचा भाग होता. ते श्रेय माझे नाही. पुस्तकेही नुसती वाचायची नसतात, जे वाचले ते डोक्यात घुसले पाहिजे, मला अजुनही अभ्यासाची हौस आहे. ध्यानीमनी नसतांना मी आय.ए.एस. झालो. आपल्या बुद्धीवर व मेहनतीत विश्वास ठेवा असे उपस्थितांना आवाहन करीत बी.एस. दादांनी दिलेल्या पुरस्काराबद्दल त्यांनी आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य बी.एस.दादा पाटील आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, अ.ध. वसावे साहेबांना दिलेल्या पुरस्कारामुळे आमच्या पुरस्काराला प्रतिष्ठा मिळाली. आम्ही आज योग्य माणसाला योग्य व्यक्तींच्या हस्ते पुरस्कार देत आहोत. अ. ध. वसावे साहेबांनी १९७५च्या आणीबाणीत सावकारांकडून गोरगरीबांच्या जमिनी मिळवून दिल्या, आदिवासींना कर्जमुक्त केले. त्यांना जाण व व्हीजन होते म्हणून ते उत्कृष्ठ काम करू शकले. त्यांच्यामुळेच उभे राहिलेल्या एकलव्य प्रशिक्षण केंद्रातून हजारो विद्यार्थी अधिकारी झाले, येथील ग्रंथचळवळ आम्ही अ.ध. वसावे साहेबांना समर्पण करीत आहोत. निर्मितीचा आनंद महत्त्वाचा असतो. म्हणूनच आम्ही एकलव्य विद्यालयात कार्यक्रमांऐवजी अ.ध. वसावे साहेबांमुळे उभ्या राहिलेल्या एकलव्य प्रशिक्षण केंद्रात कार्यक्रमाला प्राधान्य दिले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व्ही.एस. देवरे यांनी केले. प्रा. एन. डी. नांद्रे यांनी प्रास्ताविक केले, प्रा. डॉ. डी. एस. सोनवणे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. एस.एन. पाटील यांनी मानपत्राचे वाचन केले, प्रा. व्ही. एस. देवरे यांनी आभार मानले. प्रा. श्रीराम दाऊदखाने यांनी म्हटलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या प्रसंगी संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. रत्नमाला बाबुराव पाटील, नंदुरबार तालुका विधायक समितीचे मानद सचिव नानासाहेब यशवंत देवराम पाटील, प्रमोद वसावे साहेब, डॉ. सुहासभाऊ नटावदकर, प्राचार्या सौ. सुहासिनीताई नटावदकर, सुहास वसावे, जयकुमार वसावे, निंबाजीराव बागुल, प्रा. विजय भोसले, एस.एन. पाटील, व्ही.एम. अहिरराव, प्राचार्य डी.एस. पाटील, प्राचार्य डॉ. सुनिल कुवर आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# "नंदनगरी व्हावी चित्र नगरी "

## नंदग्राम शॉर्ट फिल्म फेस्टिवलला मान्यवरांचा उत्स्फूर्त सूर

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------




नंदुरबार शहरात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या "नंदग्राम "शॉर्ट फिल्म फेस्टिवलला उत्स्फूत प्रतिसाद लाभला . अजिठा फिल्म सोसायटी आणि देवगिरी चित्र साधना यांच्या संयुक्त विद्यमानाने भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी सभागृहात झालेल्या या महोत्सवात शहरातील नाट्य व चित्रपट क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी सहभाग नोंदवला.

**महोत्सवाचा थाटामाटात शुभारंभ**

कार्यक्रमाचे सुरुवात भारत माता पूजन आणि दीप प्रज्वलनाने झाली. यावेळी अजिंठा फिल्म सोसायटीचे अध्यक्ष डॉक्टर जयंत शेवतेकर उपाध्यक्ष अनिल भोळे, डॉक्टर जयेंद्र लेकुरवाळे देवगिरी चित्र साधनाचे प्रांत संयोजक किरण सोहळे आणि प्राध्यापक संतोष सोनवणे हे व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांचा यशोचीत सत्कारही करण्यात आला. प्रास्ताविकात किरण सोहळे यांनी फेस्टिव्हलमागील भूमिका स्पष्ट केली. उध्दाटनपर भाषणात डॉक्टर शेवतेकर यांनी नंदुरबारच्या समृद्ध संस्कृती वारशा वर प्रकाश टाकत सांगितले, " बोलीभाषा, लोक कला, आणि भारतीय मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी चित्रपटहे प्रभावी माध्यम असून सर्व कलाकारांनी एकत्र येणे काळाची गरज आहे."

**चित्रपटांना प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद**

यानंतर देवगिरी शॉर्ट फिल्म फेस्टिवल अंतर्गत निवडण्यात आलेल्या तीन उत्कृष्ट लघुपटासह कॅम्पस फिल्म्स, बाल चित्रपट आणी योफिमा शिष्यवृत्ती योजनेतील कलाकृतीचे स्क्रीनिंग करण्यात आले. सामाजिक, सांस्कृतिक व विचार प्रवर्तक विषयावर आधारित या चित्रपटांना प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. अभिषेक राजपूत यांनी नंदुरबार मधील सक्रिय कलाकारांचा परिचय करून दिला आणि "आम्ही सर्वजण चित्र साधनेच्या उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊ," असा मनोदय व्यक्त केला.

नंदुरबारला ' चित्रनगरी' बनवण्याची ध्येय , समारोप सत्रात डॉक्टर जयेंद्र लेकुरवाळे यांनी सांगितले की, " भारतीय दृष्टिकोनातून चित्रपट निर्मिती, मूल्य संवर्धन आणिआणि युवकांसाठी व्यवसायिक संधी उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. नंदनगरीची ओळख भविष्यात चित्रनगरी म्हणून निर्माण व्हावी यासाठी चित्र साधना कटिबंध्द आहे".

कार्यक्रमाच्या अखेरीस जितेंद्र खवळे यांनी आभार प्रदर्शन करत, " प्रत्येक महिन्यात लघुपट स्क्रीनिंगचे आयोजन आणि स्थानिक चित्रपट महोत्सव नंदुरबारमध्येच घेण्याचा मानस आहे ", असे स्पष्ट केले. ज्येष्ठ लेखक प्राध्यापक प्रभाकर भावसार, प्रख्यात रंगकर्मी रवी.डी.जोशी आणि माजी नगरसेवक निलेश पाडवी यांचे विशेष उपस्थिती लाभली, ज्यामुळे महोत्सवाला विशेष उंची लागली. यशस्वी आयोजनासाठी परिश्रम

कार्यक्रमाच्या यशस्वी अयोजनासाठी संयोजक भटू चौधरी, सहसंयोजक जितेंद्र खवळे, प्रचारप्रमुख संजय कासोदेकर, तसेच रणवीर अनंत, विजय माळवे, कुणाल वीर , कामिनी भोपे, डॉक्टर खुशाल राजपूत, ऋषिकेश मंडलिक, अरुण सोनार, संजय वानखेडे यांनी मोलाचे योगदान दिले.

# नांदगाव तालुक्यातील मुळडोंगरी येथे बोगस जन्म दाखल्यांचे वाटप

## साकोरा येथे महाराजस्व अभियानात झाला उलगडा

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------

नांदगाव तालुक्यातील साकोरा येथे सोमवारी ग्रामपंचायत कार्यालयात महाराजस्व अभियानांतर्गत विविध दाखले वाटप करण्यात आले.मात्र यावेळी काही आदिवासी महिलांच्या मुलांचे आधार कार्ड नोंदणी का होत नाही! याची चौकशी केली असता सदर महिलांना सहा महिन्यांपूर्वी बोगस जन्म दाखले दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रधानमंत्री धरती आभा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान व छत्रपती शिवाजी महाराज स्व अभियानांतर्गत भटक्या विमुक्त जाती, जमाती तसेच आदिम आदिवासींना विविध प्रकारचे दाखले व शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सोमवारी सकाळी साकोरा ग्रामपंचायत कार्यालयात शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात तहसीलदार सुनिल सौंदाणे,गट विकास अधिकारी श्रीकृष्ण पाठक, तालुका कृषी अधिकारी, नायब तहसीलदार, तालुका आरोग्य विभाग, महिला बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, पंचायत समिती विभाग, ग्रामपंचायत विभाग तसेच आधार केंद्र संचालक उपस्थित होते.यावेळी अनेकांना विविध प्रकारचे दाखले वाटप करण्यात आले.तसेच ११० महिला व पुरूषांची आरोग्य तपासणी करण्यात आली.मात्र यावेळी मुळडोंगरी, पांढरवड,आणि तांडा या भागातील काही महिला लाभार्थ्यांना मुलांचे नावे आधार कार्ड काढणे कामी जन्म दाखल्यांची तपासणी केली असता जन्म दाखल्यावरील बारकोड स्कॅन न झाल्याने आधार कार्ड काढता आले नाही.

त्यामुळे आधार केंद्र चालक कैलास हिरे यांना विचारणा केली असता त्यांनी

> "संबंधित लाभार्थ्यांना मालेगाव येथून दाखले देण्यात आले असून ,त्याची प्रत्यक्ष जाऊन पडताळणी केली जाणार आहे. रजिस्टरमध्ये जन्मनोंद न सापडल्यास संबंधितावर कडक कारवाई करून लाभार्थ्यांना जन्मनोंद झाल्यानंतरच जन्मदाखले देण्यात येतील"
>
> **तहसीलदार - सुनिल सौंदाणे, नांदगाव**

> **"सहा महिन्यांपूर्वी मालेगाव येथील दोन साहेबांनी रिक्षात येवून तीनशे रूपयात आमच्या मुलांचे जन्मदाखले दिले. ते खोटे का खरे आम्हाला काय ठाऊक"**
>
> **रूपाली हिलम - लाभार्थी**
>
> **(पांढरवड) ता. नांदगाव**

तहसीलदार सौंदाणे यांचे समोर सदर दाखल्यांचे बारकोड स्कॅन होत नसल्याने त्यांचे आधार कार्ड काढता येत नाही असे सांगितले.त्यामुळे शिबिरात एकच खळबळ उडाली. पांढरवड येथील लाभार्थी रूपाली हिलम यांनी सांगितले की,सहा महिन्यांपूर्वी मुळडोंगरी, पांढरवड ,तांडा भागात मालेगाव येथील दोन साहेबांनी आम्हाला तीनशे रुपये देवून आमच्या मुलांचे जन्माचे दाखले दिले आहेत मात्र आम्हाला आधार कार्ड काढता येत नसल्याने आज या शिबिरात आलो आहे. विशेष म्हणजे सहा महिन्यांपूर्वी वरील भागात मालेगाव पाठोपाठ नांदगाव तालुक्यातील आदिवासी भागात तीन दिवस चालणाऱ्या या बोगस कॅंपात परिसरातील आदिवासी महिलांना प्रत्येकी तीनशे रूपये घेऊन दाखले दिले गेले.मात्र याबाबत ग्रामपंचायत विभाग, आरोग्य विभाग, आशा सेविका तसेच अंगणवाडी सेविका इतक्या अनभिज्ञ कशा? याबाबत शिबिरात चर्चा सुरू होती.

याबाबत तहसीलदार सुनील सौंदाणे यांनी सांगितले की, सदर दाखले हे सामान्य रूग्णालय मालेगाव येथील असल्याने त्यांची पडताळणी केली जाऊन त्यांच्या जन्म नोंदी न आढळल्यास सबंधीतावर कारवाई करण्यात येवून सर्व लाभार्थ्यांना नविन आधार कार्ड साठी जन्मनोंद करणे गरजेचे असल्याने त्यांना कागदपत्रांची पूर्तता करून रितसर जन्मनोंद करूनच आधार कार्ड काढण्यात येतील असे सांगितले.मात्र ज्या लोकांसाठी सर्व काही शिबीराचे आयोजन करण्यात आले होते त्यात हेच लाभार्थी वंचित राहत असतील तर 'गजर गाड्याचा अन् नैवद शेंगुळ्याचा' हे म्हणणे वावगे ठरणार नाही.

# हेटीटोला पालेवाडा जादूटोण्याच्या संशयावरून कुऱ्हाडीने निर्घृण!

## स्थानिक गुन्हे शाखेचे वज्रदृढ पथक मैदानात उतरले; अवघ्या काही तासांत गुन्ह्यातील आरोपी जेरबंद!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
---------------------



दिनांक १७ जून २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वा. दरम्यान, हेटीटोला पालेवाडा येथील आसाराम कांबळे हे शेळ्या चारण्यासाठी गावाजवळील जंगलात गेले होते. संध्याकाळी शेळ्या परत आल्या, पण आसाराम घरी न परतल्याने त्यांच्या पत्नीने गावकऱ्यांच्या मदतीने शोध घेतला असता जंगलातील तलावाजवळ ते मृत अवस्थेत आढळले. त्यांच्या डोक्यामागे लोखंडी कुऱ्हाडीने प्रहार करून अत्यंत अमानुषपणे खून करण्यात आला होता. या प्रकरणी गोरेगाव पोलीस ठाण्यात कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक मा. गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांच्या नेतृत्वात तीन विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून परिसरातील नागरिकांकडून महत्त्वाची माहिती गोळा केली. तपासात मिळालेल्या सुत्रांवरून आरोपी देवेंद्र उर्फ भुरु चुन्नीलाल ताराम (वय २४, रा. हेटी, सध्या हैद्राबाद) यास हलबीटोला येथून शिताफीने ताब्यात घेण्यात आले. सखोल चौकशीत आरोपीने स्वीकारले की, तो हैद्राबादहून गावी केवळ मृतकाचा खून करण्यासाठी आला होता. मृतकाच्या जादूटोण्यामुळे त्रस्त असल्याचा संशय त्यास होता. आणि म्हणूनच त्याने निर्घृण हत्येचा कट आखून मृतकाच्या डोक्याच्या मागे लोखंडी कुऱ्हाडीने घाव घालून त्याचा खून केला. सदर गंभीर गुन्ह्यात अतिशय कुशलतेने तपास करून आरोपीस काही तासांत अटक करण्याचे श्रेय खालील धडाडीच्या पोलीस अधिकाऱ्यांना व कर्मचारीवृंदास जाते: निरीक्षक – पुरषोत्तम अहेरकर सहाय्यक निरीक्षक – धीरज राजुरकर, शरद सैंदाने पो.उ.नि. – राजेंद्र मिश्रा, महेश मेहर, विठ्ठल ठाकरे, दिक्षित दमाहे, प्रकाश गायधने, इंद्रजित बिसेन, सुबोध बिसेन पो.शि. – हंसराज भांडारकर, छगन विठ्ठले, राकेश इंदुरकर, सुनिल डहाके, योगेश रहिले चापो. – लक्ष्मण बंजार, घनश्याम कुंभलवार, राम खंडारे पोलीस अधीक्षक मा. गोरख भामरे आणि अप्पर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे धडाकेबाज पथक हे पुन्हा एकदा यशस्वी ठरले. काही तासांतच खुनाच्या आरोपीस अटक करून पोलिसांनी आपल्या कार्यक्षमतेचा ठसा उमठवला आहे. या शिताफी तपासामुळे जनतेत विश्वास निर्माण झाला असून, गोंदिया पोलिसांची तडकाफडकी कारवाई ही प्रशंसनीय आहे!

> **"कायदा आणि सुव्यवस्थेच्या रक्षणासाठी आम्ही सदैव कटिबद्ध!"**
>
> **पोलीस अधीक्षक कार्यालय, गोंदिया**

# निम्न पांझरा अक्कलपाडा मध्यम सिंचन प्रकल्प १००% भरण्यासाठी ४१५ कोटी रुपयांच्या प्रशासकीय मान्यतेस मंजुरी

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------



अक्कलपाडा प्रकल्प १००% भरण्यासाठी १९८ हेक्टर जमीन अधिग्रहित करून प्रकल्प २.७५ टीएमसी एवढा पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी शासनाने काल दिनांक १७/६/ २०२५ रोजीच्या बैठकीत निर्णय घेतला. या निर्णयामुळे धुळे शहरासह धुळे तालुक्यातील पिण्याच्या पाण्यासहित शेतीच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. हिवाळी अधिवेशनात २१ डिसेंबर २०२४ रोजी लक्षवेधी प्रश्न मांडताना आमदार राघवेंद्र (राम दादा) भदाणे यांनी अक्कलपाडा १००% भरावा यासाठी आवाज उठवला होता. त्याची दखल घेत काल रोजी च्या बैठकीत अक्कलपाडा १००% भरण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयासाठी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस साहेब, जलसंपदा मंत्री गिरीश भाऊ महाजन साहेब, पालकमंत्री मा.जयकुमार भाऊ रावल, माजी खासदार डॉ.सुभाष बाबा भामरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या बैठकीस माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ.सुभाष बाबा भामरे, धुळे शहराचे आमदार अनुप भैया अग्रवाल उपस्थित होते. अशी माहिती आमदार राघवेंद्र (राम भदाणे) यांनी दिली.

# बियाणे खरेदी मध्ये शेतकऱ्यांची फसवणूक केल्यास कृषी दुकानदारांची खैर नाही- शेकाप

## शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना खात्रीपूर्वक जीएसटी बिल घ्यावे

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
--------------------



मुखेड तालुक्यात खरीप पेरणीची तयारी सुरु झाली असून , शेतकरी बांधव बी-बियाणे चांगल्या प्रतिच्या खरेदीसाठी धावपळ करत आहेत, गतवर्षी अनेक दुकानाच्या बियाणे बोगस निघाल्यामुळे अनेक शेतकर्यांचे पेरलेले बियाणे उगवलेच नाही आता या पेरणीच्या सुरुवातीलाच सावधगिरी म्हणून, खत बी- बियाणे घेताना शेतकऱ्यांनी संबधित पक्के जि. एस. टी. बिले कृषी दुकानदाराकडून घ्याव्यात असे आवाहन भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई आसद बल्खी यांनी केले आहे. मागील वर्षी खताचा तुटवडा दाखवून बेसुमार भावाने खत विक्री केल्याच्या घटना समोर आल्या होत्या, मागील वर्षी सोयाबीनचे बियाणे उगवले नसल्यामुळे दुबार पेरणीची वेळ आली होती. पक्के बिले नसल्यामुळे कृषी दुकानदार नंतर शेतकऱ्याच्या तक्रारीची दखल घेतली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी दुकानदाराकडून पक्की पावती घेतल्याशिवाय खत बी बियाणे खरेदीच करू नये, खत बियाण्याच्या एम.आर.पी. पेक्षा अधिक पैसे दुकानदाराला देऊ नका असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जर बोगस बियाणे विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे आढळून आल्यास त्या कृषी दुकानावर मोर्चा काढण्यात येईल असेही इशारा शेकापचे भाई आसद बल्खी यांनी माध्यमाशी बोलतांना सांगितले आहे.

# मुखेड आगाराला पाच नवीन बसेसचा लाभ

## आ. डॉ. तुषार राठोड यांच्या पाठपुराव्याला यश

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
------------------------



मुखेड आगाराच्या ताफ्यात पाच नवीन एस.टी. बसेस दाखल झाल्या असून, या बसेस मिळवण्यासाठी आमदार डॉ. तुषार राठोड यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचे स्पष्ट करत त्यांनी या कामाचे श्रेय अन्य कुणीही घेऊ नये, असा टोला विरोधकांना लगावला.

मुखेड-कंधार मतदारसंघाचे आमदार डॉ. तुषार राठोड यांच्या हस्ते या बसांचा लोकार्पण सोहळा मुखेड आगारात संपन्न झाला. त्यानंतर आमदार राठोड यांनी या नव्या बसने शहरालगतच्या लातूर फाटा परिसरात फेरफटका मारून गाड्यांच्या सुविधांचा आढावा घेतला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, " पाच बसेस सध्या मुखेड आगारास मिळाल्या असून, लवकरच आणखी दहा बसेस मिळणार आहेत. शिवाय दुसऱ्या दहा बसेससाठीही प्रयत्न सुरू आहेत. या मागणीसाठी मी स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यामुळे या कामाचे श्रेय अनाठायीपणे कुणी घेऊ नये."

या उद्घाटनप्रसंगी संतोष बोनलेवाड, लक्ष्मण पाटील खैरकेकर, अशोक गजलवाड, दत्ता पाटील, किशोर सिंह चौहाण, व्यंकटराव पाटील वसुरकर, सुधीर चव्हाण, डॉ. रंजीत काळे, राजेश गजलवाड, कपिल पाटील, शिवा समराळे, दीपक मुक्कावार, बाळू नाईक, गजानन आकुलवाड आदींसह अनेक मान्यवर, कार्यकर्ते व आगारातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी वाचनालय साक्रीचे पदसिद्ध अध्यक्षपदी तहसीलदार श्री साहेबराव सोनवणे तर उपाध्यक्षपदी श्री सुरेश आण्णा सोनवणे

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------



येथील श्री. छत्रपती शिवाजी महाराज वाचनालायाची सन २०२५-३० ची पंचवार्षिक निवडणुक साक्रीचे तहसीलदार श्री. साहेबराव सोनवणे, निवडणूक शाखेचे नायब तहसीलदार राजेंद्र सोनवणे व तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी यांच्या तहसीलदारांच्या उत्कृष्ट प्रशासनामुळे, सर्वसमावेशक निर्णय घेत पारदर्शकपणे झाली. सदर निवडणुकीत निवडून आलेल्या सर्व नवनिर्वाचित संचालकांनी साक्रीचे तहसीलदार व श्री छत्रपती शिवाजी वाचनालायचे पदसिद्ध अध्यक्ष साहेबराव सोनवणे यांचा अध्यक्ष म्हणून पदभार स्विकारल्यामुळे वाचनालयाचे जेष्ठ संचालक सुरेश सोनवणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यानंतर वाचनालयच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यात वाचनालायचे उपाध्यक्ष म्हणून श्री. सुरेश सखाराम सोनवणे यांची सर्वानुमते निवड झाली. तर कार्यवाह पदी प्रा. व्ही. के. शाह यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. वाचनालयाचे सहकार्यवाह म्हणून ॲड. नरेंद्र मराठे यांची सर्व संमतीने निवड करण्यात आली. या चारही नवीन पदभार स्वीकारणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान सर्व नवनिर्वाचित संचालकांनी केला.

नवीन पदाधिकाऱ्यांची निवडणूक अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात झाली व सर्वांनी अभिनंदन व निवडीचे कौतुक केले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर आभार मानले.

नवीन पदाधिकारी निवडीनंतर वाचनालयाचे अध्यक्ष तहसीलदार साहेबराव सोनवणे, श्री. सुरेश सोनवणे, प्रा. व्ही. के. शाह, ॲड. नरेंद्र मराठे यांनी आपापले मनोगत व्यक्त केले.

श्री. छत्रपती शिवाजी महाराज वाचनालयाच्या प्रथम बैठकीसाठी वाचनालायचे अध्यक्ष साक्रीचे तहसीलदार साहेबराव सोनवणे, वाचनालयाचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष सुरेश सखाराम सोनवणे, नवनिर्वाचित कार्यवाह प्रा. विनयकुमार शाह, नवनिर्वाचित सहकार्यवाह ॲड.नरेंद्र मराठे, संचालक अजीजखा पठाण, संचालक प्रा. डी. एन. खैरनार, प्राचार्य नरेंद्र तोरवणे, प्राचार्य डॉ. लहू पवार, विजय भोसले, आर. पी. भामरे, ग्रंथपाल उज्ज्वल अग्निहोत्री आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. लहू पवार यांनी केले, आभार प्राचार्य नरेंद्र तोरवणे यांनी मानले.

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# जिल्हाधिकारींच्या शाळा भेट उपक्रमास देगलूरात उत्स्फूर्त प्रतिसाद शाळेचा पहिला दिवस; विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, सुविधांचा आढावा.

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------




शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी दिनांक १६ जून रोजी देगलूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने विशेष पाहणी दौरा पार पडला. '१०० शाळांना भेटी' या जिल्हाधिकारी नांदेड यांच्या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पेठ अमरापूर आणि भटगळी येथे भेट देण्यात आली.

या भेटीदरम्यान प्राथमिक सुविधा, शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचे मूल्यमापन, इमारतीची स्थिती आणि शाळेचा सर्वांगीण विकास यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संबंधित तपशील शिक्षण विभागाकडे पाठविण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

विद्यार्थ्यांचा शाळेतील पहिलाच दिवस असल्याने, विद्यार्थ्यांसह पालकांनाही शैक्षणिक प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शाळेशी आत्मीयतेने जोडले जाणे, नियमित उपस्थिती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज यावर अधिक भर देण्यात आला.

या भेटीदरम्यान मा. उपजिल्हाधिकारी श्री. अनुप पाटील, तहसीलदार श्री. भरत सूर्यवंशी, शिक्षणाधिकारी श्री. तोटावर साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.

# धुळे शहराची नालेसफाईची टक्केवारी ९५%

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------






धुळे शहरातील नालेसफाईचे काम ९५ टक्के पूर्ण झाल्याचा दावा धुळे महानगरपालिकेने केला असून तशा आशयाचे वृत्त आज वाचण्यात आले. या वृत्तात म्हटल्याप्रमाणे हे काम समर्थ कन्स्ट्रक्शनला देण्यात आले. समर्थने समर्थपणे काम केले. त्यांच्या समर्थ कामाला शहराचे नागरीक म्हणून आमचे समर्थन असणारच. समर्थाघरचे काम समर्थच असते. वृत्तपत्रातील वृत्तातील या ९५टक्के कामात आमच्या साक्री रोडवरील विद्यावर्धिनी कॉलेजलगतच्या बारमाही झुळझुळ झाड, वाहणाऱ्या नाल्याचे कामही कचरामुक्त झाले. त्याबद्दल महापालिकेच्या कारभाऱ्यांचे कौतुक अभिनंदन ! आभार !!

**सोबतच्या छायाचित्रात दिसणारी गुरे-ढोरे, वराह ही कन्स्ट्रक्शन अथवा पालिकेच्या मालकीची नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. जेथे जेसीबी अथवा पोकलॅण्ड मशीन पोहोचू शकत नाही तेथे या जनावरांचे असणे नक्कीच समर्थनीय आहे.**

# गोंदिया जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच महिला अध्यक्ष!

## श्रीमती दीपिका यादव यांची बिनविरोध निवड – संघटनेत महिला नेतृत्वाचा नवा अध्याय!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------



गोंदिया जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी पतसंस्थेच्या इतिहासात आज एक नवा पायंडा पडला आहे. संस्थेच्या अध्यक्षपदी पहिल्यांदाच एका महिलेला – श्रीमती दीपिका यादव, कनिष्ठ सहायक कृषी विभाग यांना बिनविरोध निवडण्यात आलं असून, उपाध्यक्षपदी श्री चंद्रशेखर शिवराम चौधरी, शाखा अभियंता (बांधकाम विभाग), यांचीही बिनविरोध निवड झाली.

हा निर्णय संस्थेच्या अडीच वर्षांच्या यशस्वी कारकिर्दीनंतर झालेल्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडीच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आला. यापूर्वीचे अध्यक्ष श्री मनोज गोंडाणे (आरोग्य विभाग) व उपाध्यक्ष श्री आनंदकुमार चर्जे (लेखा विभाग) यांनी कार्यकाळ पूर्ण करून पदांचा राजीनामा दिला होता.

ही निवड प्रक्रिया जिल्हा सहकारी उपनिबंधक श्री सिद्धार्थ गणवीर (एस.ओ.) यांच्या अध्यक्षतेखाली, सचिव श्री कमलेश बिसेन यांच्या उपस्थितीत पार पडली. सर्व संचालक मंडळाचे सदस्य, विभाग प्रमुख आणि निमंत्रित मान्यवर यावेळी उपस्थित होते.

संस्थेच्या २३ संचालक सदस्यांच्या नेतृत्वात कार्य करणाऱ्या या पतसंस्थेत पहिल्यांदाच एका महिलेला अध्यक्ष पदाची संधी मिळाली आहे. १८ विविध संवर्गांतील प्रतिनिधीत्व असूनही, एकवटून दीपिका यादव यांना बिनविरोध निवडून देणे ही बाब ऐतिहासिक ठरली आहे.

सचिव कमलेश बिसेन यांनी दिलेल्या माहितीनुसार, संस्थेत सर्वच संवर्गांना न्याय मिळावा यासाठी नियोजनबद्ध वाटप केले जात आहे. अडीच वर्ष आरोग्य विभागाला अध्यक्षपद, लेखा विभागाला उपाध्यक्ष पद देण्यात आलं होतं. यावेळी लिपिक वर्गीय महिला प्रतिनिधीला अध्यक्षपद व बांधकाम विभागातील अभियंत्याला उपाध्यक्षपद देऊन सुवर्णमध्य साधण्यात आला.

या निवड प्रक्रियेसाठी संचालक सचिन कुथे, मनोज गोंडाणे, आनंदकुमार चर्जे, कुवरलाल रहांगडाले, हंसराज गजभिये, ओमेश्वर बिसेन, रितेशकुमार शहारे, अजयकुमार रामटेके, रेखा पारधी, संगीता बिसेन, दयानंद फटिंग, सीमा भगत आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्ष-उपाध्यक्ष यांचे जल्लोषात स्वागत व अभिनंदन नवीन अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे सचिव कमलेश बिसेन, महासंघ अध्यक्ष प्रल्हाद शहारे, सौरभ अग्रवाल, संतोष तोमर, नंदलाल कावळे, भगीरथ नेवारे, तेजस्विनी चेटुले, चित्रा ठेंगरे, सुभाष खत्री, पवन पवार, संदीप मेंढे, योगेश रुद्रकार, सुरेश वाघमारे, रजनी सहारे, भारती वाघमारे आदींसह अनेक पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून स्वागत केले.

ही निवड बिनविरोध झाल्याने, संस्थेतील एकोपा आणि नेतृत्वाची परिपक्वता अधोरेखित झाली आहे. तसेच महिलांना निर्णायक भूमिकेत आणणाऱ्या या निर्णयाने संस्थेच्या कामकाजात सकारात्मक बदलाची नांदी घडवली आहे.

ही ऐतिहासिक घटना आता गोंदिया जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या संघटनात्मक वाटचालीचा नवा टप्पा मानला जात असून, महिलांच्या सक्षम नेतृत्वाची नवी पहाट या निवडीने उगम पावली आहे!

# श्री क्षेत्र येवती येथील मठाधिपती सद्गुरू नराशाम महाराज यांचा वाढदिवस साजरा

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------



मुखेड तालुक्यातील श्री क्षेत्र येवती (लघु आळंदी) येथील जागृत देवस्थान सदुरू नराशाम महाराज मठ संस्थांनचे मठाधिपती श्री सद्गुरू नराशाम महाराज यांचा ४६ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात भव्य स्वरूपात साजरा करण्यात आला आहे. श्री सद्गुरू नराशाम महाराज यांना शुभेच्छा देण्यासाठी व सद्गुरु चा आशीर्वाद घेण्यासाठी अनेक भाविकांनी एकच गर्दी केली आहे. मुखेड तालुक्यातील श्रीक्षेत्र येवती येथे श्री सद्गुरू नराशाम महाराज जागृत मठ संस्थान आहे. या संस्थांनचे मठाधिपती सद्गुरू नराशाम महाराज यांचा ४६वा वाढदिवस सद्गुरू सेवा समितीतर्फे नुकताच स्वागत लॉन्स एअरपोर्ट रोड नादेड येथे उत्साहात साजरा करण्यात आला आहे. यावेळी सद्गुरू नराशाम महाराज यांची औक्षवंत, पाद्यपूजा, पुष्परचना, फळ तुला करण्यात आली आहे. यावेळी ३१ सुहासिनी यांनी सद्गुरू नराशाम महाराज यांना औक्षवंत करून शुभेच्छा दिल्या आहेत. सदगुरु सेवा समितीच्या वतीने यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सद्गुरू नराशाम महाराज यांना शुभेच्छा देण्यासाठी व सद्गुरु चा आशीर्वाद घेण्यासाठी विविध पदाधिकाऱ्यांनी व भाविकांनी एकच गर्दी केली आहे.

यावेळी भागवताचार्य श्री सुनील महाराज आष्टीकर, नायगावचे आमदार श्री राजेश संभाजीराव पवार, पोलीस महानिरीक्षक नांदेड (आय जी) श्री शहाजी उमाप साहेब व सौ पुनमताई राजेश पवार माजी जिल्हा परिषद सदस्य नांदेड श्री प्रवीण पाटील चिखलीकर माजी जिल्हा परिषद सभापती नांदेड, नांदेड उत्तरचे आमदार श्री बालाजीराव कल्याणकर , यांची सौभाग्यवती सौ संध्याताई कल्याणकर, शिवालय उद्योग समूहाच्या अध्यक्षा, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश पाटील बेंबरेकर, डॉ. शिरटकर साहेब, डॉ. तुंगनवार साहेब, डॉ. मलबा पाटील, डॉ. ढगे साहेब, डॉ. काबरा साहेब, डॉ. डुब्बे साहेब, हेमंत बेंडे सर, भार्गव राजे सर, विशाल चौधरी सर , बांधकाम व्यवसायिक कमलेश बच्चेवार, पत्रकार महेश राजे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बाळू महाराज जोशी येवतीकर, राजू पाटील मोकासदरेकर, व्यंकट पदमवार नांदेड, संतोष महेंद्रकर मुखेड पांडुरंग पाटील टाकळीकर नांदेड, महेश धूमशेटवार नांदेड, दत्तात्रय पाटील टाकळीकर नांदेड, नंदकुमार दाचावार सकनूर, संतोष मेडेवार मुखेड, चंद्रकांत काचमवार टेंभुर्णीकर, राजकुमार कोटगिरे नांदेड संतोष भाई, प्रमोद काचावार मुखेड, पत्रकार कैलास टेंभुर्णीकर नरसी, श्रीनिवास गुंडाळे औरंगाबाद, संदीप उत्तरवार नांदेड, इत्यादी सद्गुरु सेवा समिती मधील भक्तगणांनी विशेष सहकार्य केले . येणाऱ्या भाविकांच्या व्यवस्थेसाठी अवधूत बेंडे, अभिषेक राजे, अनिरुद्ध राजे, वेदांत चौधरी, आदी सह अनेकांनी पुढाकार घेतला आहे.

# शाळा सुटताना शिरूरमध्ये वाहतूक कोंडी: पालकांच्या बेशिस्त पार्किंगमुळे नागरिक त्रस्त, पोलिसांकडून कारवाईचा इशारा!

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



शिरूर शहरातील प्रमुख शाळांसमोर, विशेषतः विद्याधाम प्रशालेसमोरील चौक, निर्माण प्लाझा परिसर आणि सीटी बोरा कॉलेज रोडवर सकाळी आणि दुपारी शाळा सुरू व सुटण्याच्या वेळेस मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यासाठी आणि सोडण्यासाठी येणारे पालक आपली वाहने रस्त्यावरच उभी करत असल्याने, तसेच काही जण उलट्या दिशेने वाहने चालवून वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन करत असल्याने ही समस्या अधिकच गंभीर झाली आहे. या बेजबाबदार वर्तनामुळे शिरूर शहरातून एस.टी. स्टँड किंवा बाबुराव नगरकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. याचा त्रास सामान्य नागरिकांना आणि प्रवाशांना सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, शिरूर पोलीस स्टेशनचे निरीक्षक संदेश केंजळे यांनी पालकांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपली वाहने योग्य ठिकाणी पार्क करावीत आणि वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. दरम्यान, विद्याधाम प्रशालेच्या प्राचार्यांशी चर्चा करून विद्यार्थ्यांची सुट्टी टप्प्याटप्प्याने देण्याबाबत सूचना करण्यात आली आहे, जेणेकरून एकाच वेळी होणारी गर्दी टाळता येईल. तसेच, पालकांसाठी वाहनतळाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उपाययोजना सुरू असल्याचेही सांगण्यात आले आहे.

वाहतूक सुरळीत ठेवणे ही केवळ पोलिसांचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि शहरातील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करणे आवश्यक आहे.

# जळगाव हादरले! 13 वर्षांच्या मुलाची गळा चिरून हत्या, परिसरात खळबळ

## शेजारच्या गावात सापडला मृतदेह, नरबळीच्या संशयाने खळबळ

संदीप पाटील
जळगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------




जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील खर्ची गावात एका १३ वर्षीय मुलाची गळा चिरून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मृत मुलाचा मृतदेह शेजारील गावच्या शेतात फेकून देण्यात आला होता, ही घटना नरबळीसाठी तर घडवून आणली गेली नाही ना, असा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. तसेच या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अखंड जळगाव यामुळे हादरलं आहे. पोलिसांनी सदर घटनेची तात्काळ नोंद करून पुढील तपासणीला सुरूवात केली आहे.

तेजस महाजन (वय १३) असं मृत मुलाचं नाव असून तो रिंगणगाव येथे राहणारा, तो काल म्हणजेच दिनांक १६ जूनपासून बेपत्ता झाला होता. तेजस अचानक दिसेनासा झाल्यानंतर त्याच्या कुटुंबीयांनी गावात व परिसरात शोधाशोध सुरू केली होती, मात्र कुठेच त्याचा पत्ता लागला नाही. रात्री उशिरापर्यंत गावकऱ्यांनी शोध घेतला, मात्र त्याचा काहीही मागमूस लागला नाही. अखेर १७ जून रोजी एरंडोल पोलीस ठाण्यात त्याच्या बेपत्ताबाबतची तक्रार दाखल करण्यात आली. खर्ची गावाजवळील एका शेतात तेजसचा मृतदेह आढळून आला. यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक तपासात तेजसच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार झाल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळी श्वानपथक आणि फॉरेन्सिक टीमला देखील पाचारण करण्यात आले. सदर घटनेचा पोलीस विविध अंगाने तपास करत असून अद्याप हत्येमागील नेमकं कारण स्पष्ट झालेलं नाही.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७